N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नागपुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** नारखेड **Year (वर्ष):** 2019
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0368 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/05/2019 21:26 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 29/05/2019
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/05/2019
**Time From (वेळेपासून):** 17:24 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/05/2019 **Time (वेळ):** 20:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 021 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/05/2019 20:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तहसील कार्यालय नरखेड समोर,नरखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** नितीन गणपत तागडे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
(c) **Date/Year of Birth (जन्म** 1979 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

## नकल फिर्याद

अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
दिनांक २९/०५/२०१९

मी श्री. नितीन गणपत तागडे, वय ४० वर्ष, व्यवसाय–खाजगी काम (अटर्नी) रा. ४२/२ आंबेडकरनगर वार्ड नं. ५ नरखेड ता. नरखेड जि. नागपूर

मी वर दिलेल्या पत्यावर राहत असुन दि. २९.०५.२०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांचे समक्ष लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करून त्यावर सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

### तक्रार

अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
दिनांक. २९/०५/२०१९

मी श्री. नितीन गणपत तागडे, वय ४० वर्ष, व्यवसाय–खाजगी काम (अटर्नी) रा. ४२/२ आंबेडकरनगर वार्ड नं. ५ नरखेड ता. नरखेड जि. नागपूर मो.क्रं. ९०४९५६३९५६

माझी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय नागपूर येथे येवून तक्रार देतो की, मी वर नमूद पत्त्यावर माझे कुंटुंबासोबत राहतो तसेच मी जिल्हा न्यायालयात वकिलाचा अटर्नी म्हणुन खाजगी काम करतो.

दि. २६/०४/२०१९ रोजी माझे व माझ्या परिवाराचे नविन राशनकार्ड बनविणे करिता तहसिल कार्यालय नरखेड येथे रितसर अर्ज केला होता. त्यावर मला दि. २८/०४/२०१९ रोजी राशनकार्डची दुय्यमप्रत तहसिल कार्यालय नरखेड येथुन प्राप्त झाली. सदरचे राशनकार्ड घेवून मी शासकिय अन्नधान्याचे दुकानात राशन खरेदी करण्याकरिता गेलो असता तेथील दुकानदाराने मला हि राशनकार्डची दुय्यमप्रत असुन ती दुकानात चालणार नाही. असे म्हटल्याने मी राशनकार्ड विषयी विचारपुस करणेकरिता तहसिल कार्यालय नरखेड येथे दि. २८/०५/२०१९ रोजी गेलो असता तहसिल कार्यालय नरखेड येथील कनिष्ठ लिपीक श्री. जावेद शेख यांनी मला तुमचे राशनकार्ड प्राधान्य लाभार्थीमध्ये टाकुन नविन राशनकार्ड तयार करून देतो. त्याकरिता तुम्हाला मला ४५००/–रू. द्यावे लागतील. असे म्हटल्याने मी तेथुन घरी परत आलो.

परंतु मला माझे व माझ्या परिवाराचे नाव प्राधान्य लाभार्थीमध्ये टाकुन नविन राशन कार्ड बनवुन देण्याकरिता रू. ४५००/– रुपये लाच रक्कम तहसिल कार्यालय नरखेड येथील  कनिष्ठ लिपीक श्री. जावेद शेख यांना देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने आज रोजी मी त्यांच्या विरूध्द कायदेशीर कार्यवाही होण्यासाठी तक्रार देत आहे. लाचेमध्ये देण्याकरीता रू ४५००/– आपले कार्यालयात जमा करीत आहे. तसेच माझे तहसिल कार्यालय नरखेड येथील कनिष्ठ लिपीक श्री. जावेद शेख यांचेशी पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही, मी त्यांच्या विरूध्द  कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी त्यांचेकडे पुर्वीपासुन उपलब्ध असलेले दोन शासकीय पंचांला पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. श्री. फाल्गुन घोडमारे यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व मी स्वाक्षरी केली व तद्नंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी माझ्याकडून लाचेकरिता वापरण्यात येणारी रक्कम रू. ४५०० (ज्यात रू. ५००/– दराच्या ९ चलनी नोटा) घेतल्या त्यावेळी सदरच्या नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तद्नंतर लाचेच्या रकमेस अॅन्थ्रासीन पावडर लावली. तसेच व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहिती दिली.

सापळा कार्यवाही दिनांक २९.०५.२०१९ रोजी नरखेड येथून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे, मी, दोन्ही पंच, सापळा पार्टीतील सर्व सदस्य शासकीय वाहन क्र. एमएच–३१ ए. जी. ९८८५ ने वेळ १३.२५ वा. रवाना झालो. त्यानंतर वेळ १५.३० वा. पंढरीनाथ कॉलेजच्या मागे येथे पोहोचलो.

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आंबेडकर नगर वार्ड क्र 5,नरखेड,नारखेड,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आंबेडकर नगर वार्ड क्र 5,नरखेड,नारखेड,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.): 91-9049563956

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जावेद हुमायु शेख | | | 1. खंडेलवाल लेआऊट नरखेड,नरखेड, नारखेड,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत<br>2. कास्बापेठ पाथर्डी ,पाथर्डी,पाथर्डी, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद आरोपी लोकसेवक जावेद हुमायु शेख वय 34 वर्ष कनिष्ठ लिपीक पुरवठा विभाग तहसिल कार्यलय नरखेड याने घ.ता.वेळी व ठिकाणी लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन तक्रारदार नितीन गणपत तागडे याचे कडून त्याचे व त्याचे परिवाराचे नाव प्राधान्य लाभार्थी मध्ये टाकुन नवीन राशन कार्ड बनवुन देण्या करीता 4500/रु लाचेची मागणी करुन लाच रक्कम 4500/रु स्वताहा आलोसे यांनी स्वीकारली अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद केला

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Mallikarjun Pralhad Ingle(I (Inspector)) / 8888440222 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचासमक्ष लोकसेवक यांची लाच रकमेची मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे वेळ १५.३७ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. १ यांचेसोबत मला लोकसेवकांकडे लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता पायदळ पाठविण्यात आले. मी पंच क्र. १ सह तहसील कार्यालय नरखेड येथे गेलो असता तेथे आलोसे श्री. जावेद शेख हे हजर मिळून आले आलोसे श्री. जावेद शेख यांनी मला माझे व माझ्या परिवाराचे नाव प्राधान्य लाभार्थीमध्ये टाकुन नविन राशन कार्ड बनवुन देण्याकरिता रू. ४५००/– मागणी केली. त्यानंतर वेळ १५.५६ वा. पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे व सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत येवून पंच क्र. १ यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले परंतु आलोसे श्री. जावेद शेख यांनी केलेली लाच रकमेची मागणी अस्पष्ट असल्याने सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही एकत्र करण्याचे ठरविले. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच आलोसे यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच रक्कम स्विकारल्यानंतर मी गळयात घातलेल्या पांढरा दुपट्टा काढून हातात घेण्याचा इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगीतले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचासमक्ष सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण व्हाईस रेकॉर्डव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर अँथ्रासीन पावडर लावलेली लाच रक्कम रू. ४५००/– (ज्यात रू. ५००/– दराच्या ९ चलनी नोटा) माझे जिन्सपॅन्टच्या उजव्या खिशात ठेवण्यात आली. त्यानंतर वेळ १६.४८ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून धाग्याच्या सहाय्याने माझे गळयात अडकून पंच क्र. १ यांचेसह तहसील कार्यालय नरखेड येथे जाण्यास पायदळ रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागो माग आले. त्यानंतर मी व पंच क्र. १ तहसील कार्यालय नरखेड येथे गेलो.

आलोसे श्री. जावेद शेख हे हजर होते. त्यांचेशी कामाविषयी बोलणी करून आलोसे श्री. जावेद शेख व मी कार्यालयाचे बाहेर असलेल्या साई पान पॅलेस येथे आलो तेथे आलोसे श्री. जावेद शेख यांनी माझ्याकडून लाच रक्कम रू. ४५००/– स्विकारली. सापळा पथकास मी माझे गळयातील पांढरा दुपट्टा काढून हातात धरून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने आलोसे श्री. जावेद शेख यास रंगेहात पकडून ताब्यात घेतले. त्यानंतर पंच क्र. १ च्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. फाल्गुन घोडमारे यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

तरी आलोसे श्री. जावेद हुमायु शेख वय ३४ वर्ष पद–कनिष्ठ लिपीक (शिधा पत्रिका), पुरवठा विभाग तहसील कार्यालय नरखेड रा. कास्बापेठ मौलाना आजाद चौक पाथर्डी, ता. पाथर्डी जि. अहमदनगर ह.मु. व्दारा श्री. संजय बारमासे यांचे घरी किरायाने खंडेलवाल ले आउट नरखेड त. नरखेड जि. नागपूर यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून आलोसे श्री. जावेद शेख यांनी मला माझे व माझ्या परिवाराचे नाव प्राधान्य लाभार्थीमध्ये टाकुन नविन राशन कार्ड बनवुन देण्याकरिता रू. ४५००/– मागणी करून लाच रक्कम रू. ४५००/– स्वत: स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. सही एस. डी. इंग्रजीत एन.जी. तागडे.

वरील लेखी फिर्यादवरून सदरचा गुन्हा नोंद केला.

सुचना विशेष सत्र न्यायालय नागपुर यांना सविनय सादर.

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

V. G. Teegade

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): Mallikarjun Pralhad Ingle
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 8888440222

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील**))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**